पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०७/०७/२०२३

### पोलीस उपआयुक्त कार्यालय परिमंडळ - ५ पुणे शहर

### परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रांत राबविणेत आलेले ऑल आऊट व कोबिंग ऑपरेशन कारवाईबाबत

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहरांत होणाऱ्यां वेगवेगळयां घटनां व गंभीर गुन्हे, तसेच मुख्यतः महिलांबाबत घडणारे गुन्हयांना वेळीच प्रतिबंध व आळा होणेकामी सर्व पुणे शहर पोलीस आयुक्तालयांत ऑल आऊट ऑपरेशन व कोबिंग ऑपरेशन कारवाई राबविणेकामी आदेश दिलेले होते. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५ कार्यक्षेत्रांतील सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग व हडपसर विभाग यांचेकडील वेगवेगळे पोलीस स्टेशनमधील अधिकारी व अंमलदार यांना नियुक्त करुन दि.०३/०७/२०२३ ते दि.०५/०७/२०२३ रोजीचे दरम्यान ऑल आऊट ऑपरेशन व कोबिंग ऑपरेशन राबविणेत आलेले होते.सदर ऑपरेशनमध्ये पो.स्टे.कडील रेकॉर्डवरील शरिरांविरुध्दचे व मालांविरुध्दचे गुन्हे करणारे गुन्हेगार,शस्त्र बाळगारे व महिलांवर अत्याचार करणारे असे सर्व वर्गवारीतील गुन्हेगारांना चेक करुन त्यांचेवर निष्पन्न बाबींनुसार कारवाई करणेत आलेली आहे.त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे :-

शस्त्र अधिनियम अंतर्गत ०५ केसेस,महाराष्ट्र पोलीस कायदा ४५ केसेस, जामीनपात्र व अजामीनपात्र वॉरंट २९ आरोपींना बजावणी, पुणे शहर व पिंपरी चिंचवड,पुणे जिल्हयांतून तडीपार केलेले आरोपी ०६ तडीपार आरोपींवर कारवाई, दारुबंदी अधिनियम ०९ केसेस, रात्रौ उशिरापर्यंत चालणारे आस्थापनांवर कारवाई ६० केसेस असे व इतर वेगवेगळे वर्गवारीप्रमाणे कारवाई करणेत आलेली आहे.तसेच परिमंडळ- ५ कार्यक्षेत्रांतील एकूण ६०६ रेकॉर्डवरील गुन्हेगारांना चेक केलेले आहे.तसेच गंभीर गुन्हयांतील व इतर कारवाईतील एकूण १०३ आरोपींवर अटकेची कारवाई करणेत आलेली आहे.अशा रितीने परिमंडळ-५ अंतर्गत वेगवेगळे पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रांतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेत आलेली आहे.तसेच सदर ऑपरेशनकामी सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग व हडपसर विभागांतील एकूण १२ पोलीस निरिक्षक,३३ सपोनिरी/पोउनिरी व १५८ पोलीस अंमलदार यांची नेमणूक करणेत आलेली होती.

सदरची ऑपरेशन हे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेशकुमार मा. पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप- आयुक्त,परिमंडळ ०५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे परिमंडळ-५ चे विभागीय मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर श्री.शाहुराजे साळवे व मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर श्रीमती अश्विनी राख यांनी व त्यांचे विभागीय पो.स्टे.कडील प्रभारी अधिकारी व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे.